## दोन गोवंशाची सुटकादीड क्विंटल कत्तल केलेल्या गोवंशाचे मांस हस्तगत

**बोरगाव मंजु** : पोलिस स्टेशन हद्दीत एका नगरात अवैधरित्या कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्देयतेने बांधून कोबुंन ठेवलेल्या दोन बैल गोवंशाची कत्तल होण्याच्या पुर्वीच सुटका केली, तर गोवंशाची कत्तल करुन अवैधरित्या विक्री होत असताना दिड क्विंटल गोवंशाचे मास हस्तगत करुन मुद्देमालासह दोघांना बेड्या ठोकल्या ही कारवाई बोरगाव मंजू पोलिसांनी ९ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास केली, पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बोरगाव मंजू येथील एका नगरात अवैधरित्या प्रतिबंधित गोवंशाचे मास विक्री करण्याच्या उद्देशाने निर्देयतेने गोवंशाची कत्तल करून मास विक्री होत आहे. तसेच दोन बैल गोवंश कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्देयतेने बांधून ठेवल्याची माहिती बोरगाव मंजू पोलिसांना मिळाली वरुन घटनास्थळी धाव घेत छापा टाकला असता घटनास्थळी दोनबैल जिवंत, तर दिड क्विंटल गोवंशाचे मास हस्तगत करुन साहित्य जप्त केले, घटना स्थळी एक पांढऱ्या रंगाचा मोठे कान मोठे व जाडशिंगे असलेला बैल शेपूट गोंडा काळा वय अंदाजे आठ वर्ष अंदाजे किंमत ३०००० रुपये व नंबर दोन हे कटिया रंगाचा मोठे कान व जाड शिंगे असलेला बैल त्याचे डाव्या कानांवर बिल्ला, गोंडा काळा वय आठ वर्ष किंमत ३५००० असे एकूण दोन गोवंश बैलं एकूणकिंमत ६५ हजार कत्तली करता बांधून ठेवलेले मिळून आले दरम्यान आठ पांढऱ्या रंगाच्या पुतळी मध्ये अंदाजे १५० किलो गोमास किंमत तीस हजार रुपये आढळून आले.

## ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासा करीता मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान मध्ये सहभागी व्हावे: आ. प्रकाश भारसाकळ




**▪अकोट,दि १० (प्रतिनिधी) :** दिनांक १० सप्टेंबर, तालुका सुंदर व समृध्द असुन तो या पेक्षाही समृध्द कसा करता येईल या साठी तसेच ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास करण्यासाठी मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान सर्व ग्रामपंचायतींनी राबवावे. बक्षीस तर मिळवायचेच आहेत परंतु सदर अभियान राबविताना, आपल्यामधील ज्या काही उणिवा आहेत त्या दुर करुन नागरीकांना उत्कृष्ट सुविधा प्रदान करण्याच्या उददेशाने सदर अभियानामध्ये काम करावे. गरजु/बेघर लाभार्थींना घरकुल उपलब्ध करुन देताना बांधकामासाठी जागा नाही, अश्या लाभार्थींना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन मा. आमदार प्रकाश भारसाकळे यांनी केले.

अकोट पंचायत समिती मधील सभागृह येथे आज बुधवार दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी अकोट तालुक्यातील उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्राम रोजगार सेवक यांना मार्गदर्शन करीत होते. दोन सत्रामध्ये आयोजीत मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाच्या तालुका स्तरीय कार्यशाळेत अध्यक्षीय स्थानावरून ते बोलत होते. गावाच्या शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी या अभियानाच्या माध्यमातुन चळवळ उभी व्हावी. सदर अभियाना अंतर्गत मिळणारी बक्षीसे, अभियान का व कशासाठी राबवायचे या विषयावर राजेश खुमकर, सहा.गट विकास अधिकारी यांनी आपले प्रास्ताविकमधुन सविस्तरपणे सांगितले.गट विकास अधिकारी मायाताई वानखडे यांनी सदर अभियाना अतर्गत एकूण सात मुद्यांवर ग्रामपंचायतीना काम करावयाचे असुन त्यामध्ये ग्रामपंचायत कर वसुली, पाण्याचा ताळेबंद करणे, ग्रामपंचायत स्तरावरील संस्थाचे सेवांचे बळकटी करणे व नाविण्यपूर्ण उपक्रमाबाबत विशेष मार्गदर्शन केले.

## शेतात अडाण वाढल्याने शेतकरी हैराण

मूर्तिजापूर : अनेक दिवसांपासून सतत पाऊस सुरु असल्याने शेतकऱ्यांना शेतात जाणे मुश्किल झाले असून तण मात्र पिकांपेक्षा तिपटीने वाढल्याने चिखलातच तण कापणी साठी शेतकरी तारेवरची कसरत करीत आहेत. तसेच शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे. सुरुवातीला पीके जोमदार असताना अचानक पावसाची जोरदार एन्ट्री झाली. अनेक दिवसांपासून पाऊस उसंत घेत नसल्याने शेतात मात्र मोठ्या प्रमाणात तण फोफावले आहे.

## तळेगाव बाजार परिसरात रानडुक्कराचा धुमाकूळ कपाशी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**▪तेल्हारा,दि १० (प्रतिनिधी) :** तालुक्यातील तळेगाव बाजार परिसरात जगंली रानडुक्करानी धुमाकूळ घातला असून शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करित आहे या गंभीर बाबीकडे वनविभागाचे साफ दुर्लक्ष होत आहे. तळेगाव बाजार येथील अल्पभूधारक शेतकरी अशोक ओंकार मानखैर यांचे कडे दोन एकर शेती असून प्रचंड मेहनत करून शेतात कपाशी लागवड केली सध्या कपाशी चे पिक बर्यापैकि दिसत असताना जगंलि



रानडुक्करानि धुमाकूळ घालुन अर्धा एकर कपाशी चे नुकसान केले आहे यात शेतकरी मानखैर

यांचे मोठे नुकसान झाले आहे वनविभाग अधिकारी यांनी चौकशी करून मदत करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. वन्यप्राणी यानि शेतात पिकांचे नुकसान केल्यास वनविभाग अकोला येथे ऑनलाईन अर्ज शेतकरी यांनी करावा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्वरित शेतात येऊन पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित मदत देण्यात येईल. सुनील राऊत वनविभाग अधिकारी आकोट यांनी सांगितले.

## कुटासा येथील शेतकऱ्यांना बॅक ऑफ महाराष्ट्र शाखेकडून कर्ज वसुलीसाठी नोटीसा

### त्वरीत कर्ज न भरल्यास कारवाई बँकेकडून नोटीस.शेतकऱ्यांना धास्त

**▪कुटासा,दि १० (प्रतिनिधी) :** गत दोन वर्षापासून असलेली सततची नापीकी ,कपाशीला मिळत असलेल्या अल्पभावामुळे शेतकरी पीककर्ज भरु शकले नाहीत. सध्या सततच्या पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.शेतकरी चिंतेत असताना बँकांनी कर्ज वसुलीसाठी शेतकऱ्यांना नोटीस पाठवणे सुरू केले आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी महायुतीच्या सरकारने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. निवडणुकीनंतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी कर्जमाफीची मागणी केली. तसेच सत्ताधारी नेत्यांनीही कर्जमाफी करणार असल्याचे वक्तव्य केले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये कर्जमाफीची आशा पल्लवित झाली. मात्र शेतकऱ्यांना कर्ज माफीही झाली नाही. तर त्यांना थकीत कर्ज भरण्याएवढे उत्पन्नही झाले नाही. सोयाबीनला अल्प भाव तसेच कपाशीच्याही भावात वाढ झाली नाही.त्यात कुटासा येथील महाराष्ट्र बँकेकडून शेतकऱ्यांना कर्ज वसुलीसाठी नोटीसा देण्यात आल्या आहेत. सततच्या पावसामुळे शेतातील कपाशीचे पिक हे




सडण्याच्या मार्गावर असुन पिक होईल का नाही याची सुद्धा शाश्वती सध्या शेतकऱ्यांना नाही त्यात बँकेने सक्त कर्ज वसुलीसाठी नोटीस दिल्यानंतर शेतकरी पुर्णता हवालदिल झाला आहे.आधीच सततची नापीकी त्यात ही नोटीस कुठुन पैसे आननार कसे कर्ज फेडणार या चिंतेत शेतकरी सापडला आहे.शासनाने त्वरित लक्ष न दिल्यास या नोटीसाच्या धास्तीने कुटासा येथे शेतकरी आत्महत्या वाढण्याची भिती सध्या वेक्त केली जात आहे.माझ्या कडे बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे पिक कर्ज थकीत आहे दोन वर्षांपासून सततची नापीकी अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे पिक नष्ट झाल्याने मी बॅकेचे कर्ज फेडु शकले नाही.

## रमाबाई आंबेडकर सार्वजनिक वाचनालयात वृक्षारोपण

**अकोला:** रमाबाई आंबेडकर सार्वजनिक वाचनालय मलकापूर येथे सम्यक वाचक ग्रुपचे वतीने सम्यक वाचक ग्रुपचे सकीय सदस्य बबनराव सदाशिव यांचा वाढदिवस व शिक्षक दिना निमित्त वाचनालयाचे प्रांगणात वृक्षरोपण करण्यातआले. यावेळी प्राध्यापक जाधव सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी वाचनाला महापुरुषांचे फोटो फ्रेम दिले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षरोपण करून ती जगविणे काळाची गरज आहे, असे बाबराव दंदी यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले. यावेळी सम्यक वाचक ग्रुपचे सदस्य प्रकाश वानखडे, सिद्धार्थ वानखडे, बाळकृष्ण खंडारे, संजय सोनवणे, विकास सदाशिव, किशोर तेलगोट, वसंत इंगोले, विद्यमान गवई प्रा. भोवते, शांताराम गोपनारायण, प्रभाकर भिसे, सेवानंद इंगळे, अमोल खैर उपस्थित होते.

## ध्येय गाठण्यासाठी माइंडसेट महत्वाचा प्रा. संदिप मुर्तडकर

**आलेगाव:** प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या शालेय शिक्षणापासून ध्येय गाठता यावे या करीता वर्ग ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मेरिट मेकर प्रोजेक्ट माध्यमातून आलेगावातील अमरावती येथे कार्येरत मेरिट मेकरचे संचालक प्राध्यापक संदीप मुर्तडकर यांनी नुकतेच मार्गदर्शन करून परीक्षेची तयारी करताना वेळेचे नियोजन, आत्मविश्वास हा अभ्यासा करीता किती महत्वाचा असतो या बाबत टिप्स सांगून, टॉपर विद्यार्थ्यांचे गुपित सांगितले. तसेच ते पुढे बोलताना म्हणाले की सदर वरील ट्रिक्स आणि टिप्सच्या प्रेरणेतून विद्यार्थी हा १०० पैकी १०० चा संकल्प करीत नव्या जोमाने अभ्यासाला लागण्यासाठी माईड सेट कसा तयार करावा हे सांगितले. पातूर तालुक्यातील आलेगाव येथिल नामांकित शिक्षण संस्था असलेल्या नूतन विद्यालय तसेच प्रभा प्रकाश कॉन्वेट मध्ये विद्यार्थ्यांना अभ्यास मार्गदर्शन करण्यासाठी अमरावती येथे कार्यरत असलेले मेरिट मेकर प्रोजेक्ट चे संचालक प्रा. संदिप मुर्तडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी अकोला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण अभ्यासाला नवे बळ देण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र जैन तसेच अक्षय जैन यांनी पुढाकार घेतला अमरावती येथील सुप्रसिद्ध स्टडी कोच प्रा. संदीप मुर्तडकर यांनी आलेगाव येथे येऊन विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन करत केवळ अभ्यासच नव्हे, तर यशस्वी जीवनशैलीचेही धडे दिले.

परीक्षेची तयारी करताना वेळेचे नियोजन, आत्मविश्वास, आणि टॉपर विद्यार्थ्यांचे गुपित सांगत विद्यार्थ्यांमध्ये यशाची उमेद निर्माण केली. विशेषता ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार असतात परंतु योग्य मार्गदर्शन अभावी पुढे जाण्यासाठी धजावत नाहीत. त्यामुळे या सत्रात त्यांनी मुलांना सांगितले की, हटॉपर होण्यासाठी केवळ हुशारी पुरेशी नसते, तर वेळेच योग्य नियोजन, सातत्य, आणि सकारात्मक मानसिकता याची गरज असते. विद्यार्थ्यांना अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी जसे की झ लक्ष न लागणे, पाठांतरात अडथळे, रिव्हिजनचे टेंशन, गृहपाठाचा ताण न यावर सोप्या ट्रिक्स आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाय सांगितले गेले.

## थोडक्यात

### लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा द्यावी

**अकोला** : एका सराईत गुन्हेगाराने चाकूचा धाक दाखवून एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केला आहे. पीडित मुलीचे सर्व नातेवाईक गणेश विसर्जनासाठी गेले होते. यावेळी घरी कोणी नसल्याचा फायदा घेत आरोपी तौहिद समीर बैद (२४) हा पीडित अल्पवयीन मुलीच्या घरी आला. आरोपीने चाकूचा धाक दाखवत लैंगिक अत्याचार करून जीवे मारण्याची धमकी सुद्धा दिली. तसेच कुटुंब, नातेवाईकांना जिवेमरण्याची धमकी धमकी दिली आहे. आरोपी तौहिद समीर बैद हा फरार झाला असून हे प्रकरण डाबकी रोड पोलीस स्टेशनमध्ये अंतर्गत नोंदविले गेले आहे. या प्रकरणात आरोपीला कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांनी एका निवेदनातून जिल्हा पोलिस अधिक्षकांना केली आहे.या घटनेत अल्पवयीन मुलीच्या अब्रू व सुरक्षिततेचा आरोपीने भंग केला आहे. ही घटना अत्यंत निंदनीय व सम ाजाला कलंकित करणारी आहे. ही घटना केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सुरक्षितता व न्यायव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे करणारी आहे. अल्पवयीन मुलींवर होणारे असे अत्याचार हे समाजातील दुर्बल घटकांना धमकी देणारे असून, यामुळे महिलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. आरोपी हा सराईत गुन्हेगार असून, त्याने यापूर्वीही अशा प्रकारचे गुन्हे केले असण्याची शक्यता आहे. आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याने, त्याला तातडीने अटक करून कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे. अशा गुन्हेगारांना वेळीच कठोर शिक्षा न दिल्यास, समाजातील असुरक्षितता अधिक वाढेल व विशेषतः महिलांच्या व अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेवर परिणाम होईल. जेणेकरून न्यायप्रक्रिया लवकर पूर्ण होऊन पीडितेला न्याय मिळेल आणि अशा गुन्हेगारांना धडा मिळेल. परिणामी आरोपीला तातडीने अटक करून त्याच्याविरुद्ध पुरावा गोळा करण्यात यावा आणि कठोरतम शिक्षा देण्यात यावी. आरोपी विरुद्ध कठोर कायद्यांतर्गत आरोपपत्र दाखल करण्यात यावे. या प्रकरणाची सुनावणी फास्ट ट्रॅक कोर्टात करण्यात यावी, जेणेकरून न्यायप्रक्रिया लवकर पूर्ण होईल व पीडितेला न्याय मिळेल. आरोपीच्या पूर्व गुन्ह्यांची चौकशी करून, त्याला जन्म ठेप किंवा मृत्युदंडासारखी कठोर शिक्षा देण्यात यावी. पीडित मुलीला व तिच्या कुटुंबाला आवश्यक संरक्षण, वैद्यकीय मदत व कायदेविषयक साहाय्य पुरविण्यात यावे. अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी शहरात पोलिसिंग वाढविण्यात यावे व जागृती मोहीम राबविण्यात यावी. या प्रकरणात कोणताही विलंब किंवा दुर्लक्ष सहन केले जाणार नाही. न्यायव्यवस्था ही दुर्बलांसाठी असते आणि अशा घटनांमध्ये कठोर कारवाई न झाल्यास समाजातील विश्वास उडेल. आपण या तक्रारीची योग्य ती दखल घेऊन तात्काळ कारवाई कराल, अशी अपेक्षा करतो. ही तक्रार प्राप्त झाल्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी व मला त्याबाबतची माहिती देण्यात यावी. अन्यथा, मी उच्च न्यायालय किंवा मानवाधिकार आयोगाकडे याबाबत दाद मागेल. जिल्हा प्रमुख अश्विन नवले, उप जिल्हा प्रमुख शशि चौपडे, योगेश अग्रवाल, निशा ग्यारल, राजेश दांडेकर, भुषण इंदौरिया, सुमित पानझाडे, उमेश लांडगे, प्रदीप कासिद, विशाल धोटे, उज्वला इगळे, चेतन जैन, विनोद अग्रवाल, दुर्गा अस्वारे, अनिकेत खांडेकर, राजेश दुबे, विजय प्रधान, भानुदास गोंधेकर, श्याम वागले आदी उपस्थित होते.

### सिद्धार्थ बुद्धविहार लाखपुरी येथे धम्म मेळावा

**मूर्तिजापूर** : भारतीय बौद्ध महासभेचे वतीने सिद्धार्थ बुद्ध विहार लाखपुरी या ठिकाणी भव्य धम्म मेळावा नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस आद, नंदकुमारजी डोंगरे, कोषाध्यक्ष विजयजी जाधव, तालुकाध्यक्ष आकारामजी बोरखडे, वचितचे तालुकाध्यक्ष सुनील सरदार हे उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित अकोला येथे होत असलेल्या ऐतिहासिक धम्मचक्र प्रवर्तन दिवसाच्या निमित्ताने भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. या निमित्ताने जिल्ह्यात ठीक ठिकाणी धम्म मेळाव्याच्या आयोजन केल्या जात आहे. सिद्धार्थ बुद्ध विहार, लाखपुरी येथे धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्ह्याचे भारतीय बौद्ध संघकाम ेदरजी पाटील,विशाल बावस्कर, आयुष्यमान मेश्राम, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष मा. सुनीलजी सरदार, रामराव इंगळे, कोषाध्यक्ष इंगळे, इंगोले सर, अमोल वानखडे तसेच भारतीय बौद्ध महासभेचे संपूर्ण तालुका कार्यकारणी, बंचित ची संपूर्ण कार्यकारणी, उपासक, उपासि का संघ लाखपुरी, भटोरी, दातवी, दाताळा, शेलु बोंडे, लाईत, मंगरूळ कांबे, जांबा बुजुर्ग, जांबा खुर्द, दुर्गव डा, रेपाडखेड, रसूलपुर, वाघझडी, विरवाडा, पारद, मुंगशी, घुंगशी, आणि सांगबावेळ या गावातील मोठया संख्येने बौद्ध उपासक, उपासिका उपस्थित होते.

## कृषिच्या विद्यार्थ्यांनी गिरविले शेतकऱ्यांना कमी खर्चाच्या शाश्वत शेतीचे धडे!



**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी) :** शाश्वत शेती व संपन्न शेतकरी अभियानाचा एक भाग म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ वैदर्भीय शेती पद्धतीत काळसुसंगत आवश्यक बदल घडवत पारंपरिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा एकात्मिक पद्धतीने वापर शेतकरी बांधवांना आर्थिक स्थैर्य प्राप्तीसाठी प्रयत्नशील आहे. यांच उपक्रमाचा भाग म्हणून नुकतेच अकोला जिल्ह्यातील बाबभुळगांव येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत निंबोळी अर्क तयार करणे, त्याचा वापर व फायदे या विषयावर प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. सदर प्रात्यक्षिक अकोला कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर व कीटकशास्त्र शाखा प्रमुख डॉ. गिरीश जेऊघाले तथा डॉ. प्रेरणा चिकटे यांचे मार्गदर्शनाखाली पार पडले.या कार्यक्रमास बाभुळगांव येथील स्थानिक शेतकरी उपस्थित होते.


**CHANGE IN NAME**

I Have Change My Name...
Before Marriage
--------From----------
**SARIKA ANJUM SHAIKH IQBAL**
---------TO---- After Marriage
------
**SHAKERA ANJUM MOHAMMAD AMIQUE**
**DOB - 05/03/1993**
My Residential Address
is - Ward No 2 Main Road
Hatrun Balapur Akola 444109

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
in My Passport No is -
**(K972801)**
-------From----------
**GHAFFAR KHAN**
----------TO------------
**GAFFAR KHAN BISMILLAH KHAN**
My Residential Address
is - Noor Colony Jafrabad
Shiloda Road Akola 444006


## पादुका संस्थान मुंडगाव येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

### १४३ रुग्णांची होणार मोफत शस्त्रक्रिया




**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी) :** श्री गजानन महाराज पादुका संस्थान तर्फे नेहमीच नाविन्यपूर्ण सामाजिक उपक्रम राबविले जातात. संस्थानच्या वतीने नियमित आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते. गेल्या चार वर्षापासून दमानी नेत्र रुग्णालय अकोला च्या वतीने दरवर्षी दोन शिबिराचे आयोजन केले जाते. यावर्षी या शिबिरा मार्फत आतापर्यंत हजारो गरजू रुग्णांनी लाभ घेतला आहे. दिनांक ८ सप्टेंबर रोजी झालेल्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात ३८० रुग्णांनी नेत्र तपासणी केली. यात १४३ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरासाठी पात्र ठरले. ७८ रुग्णांनी अल्प दरात चष्म्याचा लाभ घेतला. १४३ रुग्णांची दमानी नेत्र रुग्णालय अकोला येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटक म्हणून दमानी नेत्र रुग्णालयाचे व्यवस्थापक सभापतीजी शुक्ल तर अध्यक्ष म्हणून डॉ. सुरेश रौंदळे हे होते.विशेष अतिथी म्हणून श्री शशिकांतजी अग्रवाल, श्री तुळशीरामजी इस्थापे, विश्वस्त नागास्वामी संस्थान बोर्डी, श्री दिनेश देशमुख, डॉ. किशोर रत्नपारखी, जिल्हाध्यक्ष साई सेवा समिती अकोला, गजानन ताठे अध्यक्ष, जयपुरी महाराज संस्थान निमखेड बाजार, गजानन काळपांडे हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रवीण भिरडे, उद्योजक, स्वप्निल सरकटे, प्रतिनिधी, दै. जनमाध्यम, कमलेश राठी, प्रतिनिधी, दै. देशोन्नती, राहुल भेले प्रतिनिधी दै. दिव्य मराठी, विशाल गवई, जिल्हा प्रतिनिधी न्यूज २४/७ हे होते. यावेळी संस्थानचे अध्यक्ष विलास बहादुरे, कोषाध्यक्ष विजय ढोरे, सचिव शरद सोनटक्के, व्यवस्थापक महेश गाढे, विश्वस्त राजेश खोकले यांनी कार्यक्रमाचे यशस्वी व्यवस्थापन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नरेंद्र ठाकरे, अरुण थारकर, अतुल काळे, अनंत वानखडे, निलेश देवगिरे उपस्थित होते.

## बेलखेड कोठा रायखेड दानापूर शेत पाणंदरस्ता मोजणी मोहिमेला सुरूवात

**▪तेल्हारा,दि १० (प्रतिनिधी) :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा भाग म्हणून तेल्हारा तालुक्यातील शेतरस्त्यांची पाहणी मोहिमेला सुरूवात करण्यात आली. तेल्हारा तहसीलदार समाधान सोनवणे यांचे मार्गदर्शन खाली मंडळ अधिकारी संजय साळवे यांचे देखरेखीखाली बेलखेड ग्रामस्थांच्या उपस्थितीत महसूल विभागाने अतिक्रमणमुक्त शेतरस्त्यांची मोहीम सुरू केली आहे.छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत शेतरस्ते कायम स्वरूपी नोंदविण्यासाठी ही कारवाई हाती घेण्यात आली आहे.बेलखेड शिवारात आज मोहीमेच्या पहिल्या टप्प्यात बेलखेड कोठा रायखेड दानापूर रस्ता पाहणी करून ३ किलोमीटर रस्ता मोजणी करण्यात आली. तसेच नकाशावर असलेले रस्ते आणि नकाशावर नसलेले रस्ते परंतु वापरात



असलेले रस्ते सुद्धा पाहणी करण्यात आले. या दरम्यान तहसीलदार समाधान सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली, नायब तहसीलदार राणे साहेब, मंडळ अधिकारी संजय साळवे यांचे देखरेखीत बेलखेड येथे मोहिमेला सुरूवात झाली. यावेळी ग्राम महसूल अधिकारी संदीप ढोक, ग्रामविकास अधिकारी कासदे,तालुका भूमी अभिलेख चे एम. एस. धुर्वे, एस. एस. पळसपगार या कामी कार्यरत होते. गावातील प्रतिष्ठित नागरीक तथा पादंण रस्ता शेतकरी गजानन उंबरकर,अतुल गोमासे,पत्रकार सत्यशील प्र सावरकर,गणेश सोनटक्के दिपक टोहरे, वैभव अरूडकर,विनोद भोपळे, अशोक येनकर, सुरेश इंगळे,ज्ञानेश्वर बोबडे, प्रमोद भड,ब्रम्हदेव जाधव, शुभम येनकर,प्रशांत खुमकर, राजेश सुशिर,योगेश तायडे, गोविंद नागपूरे,अंकीत काळपांडे,राजु परमाळे,संतोष भोपळे, विनोद उमा ळे,निलेश सुशिर, संतोष भड इत्यादींनी उपस्थित राहून पुढाकार घेतला आहे.


RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

